# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,नाशिक
## MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK

MUHS

दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक-४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik-422004
EPABX: 0253- 2539100/300, Fax: 0253 - 2531836, Ph.: 2539217
Email: coe@muhs.ac.in Website: www.muhs.ac.in

डॉ. अजित गजानन पाठक
एम.बी.बी.एस.एम.डी. (न्यायवैद्यकशास्त्र)
परीक्षा नियंत्रक

Dr. Ajit Gajanan Pathak
M.B.B.S.,M.D.(Forensic Medicine)
Controller of Examinations


जा.क्र.मआविवि/एक्स-३/७०३९९/२०१८ दि.१९/१२/२०१८

परिपत्रक क्र.९३/२०१८

प्रति,
मा.अधिष्ठाता/प्राचार्य,
सर्व संलग्नित आयुर्वेद व युनानी महाविद्यालये,
मआविवि, नाशिक

**विषय :** **आयुर्वेद व युनानी विद्याशाखेंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासुन बी.ए.एम.एस. व बी.यु.एम.एस. अभ्यासक्रमास प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्यांना ATKT सुविधा देणेबाबत...**

**संदर्भ :** १) परीक्षा विभागाची अधिसुचना क्रं.४९/२०१७, दिनांक ३०/११/२०१७
२) विद्याशाखेच्या दिनांक ११/०९/२०१८ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र.०२/२०१८

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषद, नविदिल्ली यांनी दिनांक ०७/११/२०१६ च्या अधिसुचनेन्वये प्रसिध्द केलेले राजपत्रातील परीक्षा व अभ्यासविषयक बाबी शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये प्रथम वर्षास प्रवेशित तुकडीपासून विद्यापीठ संलग्नित आयुर्वेद व युनानी महाविद्यालयांना लागू करण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने ATKT सुविधे संदर्भात विद्यापीठाद्वारे अधिसुचना क्रं.४९/२०१७, दिनांक ३०/११/२०१७ अन्वये विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

तथापि, बी.ए.एम.एस. व बी.यु.एम.एस. (२०१७) पदवी अभ्यासक्रमासाठीच्या काही विद्यार्थ्यांनी विहित शुल्कासह परीक्षा अर्ज भरुन परीक्षेस प्रवेशित झालेले नाही व सर्व विषयाच्या (प्रात्यक्षिक व सैध्दांतिक) परीक्षेस अनुपस्थित राहील्याचे आढळून आले आहे. त्याअनुषंगाने अनेक महाविद्यालयांकडून अशा विद्यार्थ्यांना ATKT सुविधा देण्यात यावी अगर कसे याबाबत विद्यापीठास विचारणा करण्यात आली असल्याने सदर विषय दिनांक ०१/०९/२०१८ व दिनांक ११/०९/२०१८ रोजी संपन्न झालेल्या विद्याशाखेच्या बैठकीत विचारार्थ सादर केला असता विद्याशाखेने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

***"आयुर्वेद व युनानी विद्याशाखेकरीता परीक्षा विभागाच्या नियमातील तरतुदीनुसार जर एखादा विद्यार्थी परीक्षा फॉर्म भरल्यानंतर सर्व विषयाकरीता (प्रात्यक्षिक किंवा सैध्दांतिक यापैकी कोणत्याही) सदर परीक्षेत अनुपस्थित राहिल्यास त्याचा तो Attempt ATKT करीता गृहीत धरण्यात येवू नये मात्र कोणत्याही एका विषयाची अथवा अधिक विषयाची (प्रात्यक्षिक किंवा सैध्दांतिक यापैकी कोणत्याही) परीक्षेस बसला तर ATKT करीता सदर विद्यार्थ्यांचा Attempt पकडण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले."***

यास्तव सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, सदर बाब बी.ए.एम.एस. व बी.यु.एम.एस. अभ्यासक्रमासाठीच्या विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणुन द्यावी व परिपत्रकास महाविद्यालय स्तरावर व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

**परीक्षा नियंत्रक**

**प्रत माहितीस्तव :-**

१) विभाग प्रमुख, आयुर्वेद व युनानी कक्ष (पदवी), शैक्षणिक विभाग

२) परीक्षा नियंत्रक कार्यालय

३) परीक्षा प्रशासन विभाग